कर्नाळा
सोमवार दि. १५ जूलै २०१३ ५

# मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन



प्रतिनिधी

उरण, दि. १४ : स्वर्गीय वसंत परशुराम पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शेखर वसंत पाटील यांनी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित केले होते. या शिबीराचे उद्घाटन आमदार विवेक पाटील यांनी दिपप्रज्व-लीत करून केले. यावेळी सुधाकर पाटील, नगरसेविका लता शेखर पाटील उपस्थित होते.

या शिबीरात आमदार विवेक पाटील यांचा सत्कार शेखर पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच उमासाप संघटनेच्या पर्यावरण संघटना उपगराध्यक्षा, महादेव घरत, नाना पाटील, गौरी देशपांडे, निलम कदम आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

सुप्रसिध्द नेत्रतज्ञ डॉ. सुहास हळदीपुरकर यांनी पनवेल-उरणच्या ज़नतेसाठी मोतीबिंदू आणि नेत्रतपासणी शिबिराचे आयोज़न करून फार मोलाचे सहकार्य केले असे मत याप्रसंगी आमदार विवेक पाटील यांनी व्यक्त केले.

या शिबीरात एकूण ११० नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. १० नागरिकांवर पनवेल येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली.

याबद्दल डॉ.सुहास हळदीपुरकर यांचा गौरव करण्यात आला.